Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- II FEBRUARY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# बौद्ध धर्माचा दक्षिणपुर्व आशिया व जपान मधिल प्रसार – तेंदाई संप्रदायाच्या संदर्भात एक विश्लेषणात्मक अभ्यास

संशोधक
प्रा. प्रणोती म. सहारे
डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस
कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर

मार्गदर्शक
प्रा. डॉ. बालचंद्र एन. खांडेकर
निवृत्त विभागप्रमुख (पाली प्राकृत विभाग)
पी.डब्ल्यु.एस.महाविद्यालय, नागपूर

प्रस्तावना

बौद्ध धर्म (बौद्ध धम्म) हा भारताच्या श्रमण परंपरेतून निर्माण झालेला केवळ एक महान धर्म नसुन एक महत्वपूर्ण तत्वज्ञान आहे. बौद्ध धर्म हा जगातील अतिप्रचिन व जगभर पसरलेला धर्म आहे. इ.स.पू. ६ व्या शकतात बौद्ध धर्माची स्थापना झालेली आहे व तथागत बुद्ध हे बौद्ध धर्माचे संस्थापक आहेत. तथागत बुद्धांच्या महापीरनिर्वाणानंतर पुढील दोन शतकात सम्राट अशोकांच्या काळात बौद्ध धर्माचा भारतभर प्रसार झाला आणि त्यापुढील दोन हजार वर्षामध्ये हा धर्म मध्य, पूर्व आणि आग्नेय जम्बुमहाद्वीपामध्ये (ईस्ट इंडीज) व सर्व जगात पसरला. बौद्ध धर्म हा आपल्या जन्मस्थानापासून निघून जगभर पसरलेला जगातील पहिला विश्वधर्म (जगाचा धर्म) होय. बौद्ध धर्म हा निरीश्वरवादी, अनात्मातावादी, समतावादी, विज्ञानवादी, मानवतावादी धर्म होय. बौद्ध धर्म हा स्वातंत्र्य समता, बंधुत्व, करूणा, मैत्री (प्रेम), प्रज्ञा, मानवी, मूल्यें विज्ञानवाद या तत्वांचा पुरस्कर्ता आहे. बौद्ध धर्म हा आधुनिक विज्ञान आणि मानवी मूल्यांचे समर्थन करणारा जगातील एकमेव धर्म आहे.

## बौद्ध धर्माचा प्रसार

बौद्ध धर्म हा जगातील एक प्रभावी धर्म असून या धर्माचे १.८ अब्ज ते २.१ अब्ज लोक अनुयायी आहेत. लोकसंख्येच्या दृष्टीने हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा धर्म आहे. जगातील लोकसंख्येमध्ये २५ टक्के ते २९ टक्के बौद्ध लोकसंख्या आहेत. चीन देशात सर्वाधिक बौद्ध धर्मिय आहेत. तेथील ९१ टक्के चीनी लोकसंख्या (१२२ कोटी) बौद्ध धर्मीय आहे. जगातील जवळजवळ २० देशांत बौद्ध धर्म हा बहुसंख्यक आहे. आज सर्वच खंडात भगवान बुद्धांचे अनुयायी आहेत. आशिया खंडात तर बौद्ध धर्म हा मुख्य धर्म आहे. आशिया खंडाची जवळपास अर्धी (४९ टक्के) लोकसंख्या ही बौद्ध धर्मीय आहे. जगभरातील बुद्ध अनुयायांची लोकसंख्या ही १८० कोटी आहे. अनुयायांच्या तुलनेत येशू ख्रिस्तानंतर (२अब्ज) जगतात सर्वाधिक अनुयायी तथागत बुद्धांना (१.८ अब्ज) लाभलेले आहेत. सर्व बुद्ध अनुयायांची एकत्रित लोकसंख्या ही २.३ अब्जांवर आहे. म्हणजेच तथागत बुद्ध जगात सर्वाधिक अनुयायी (२. ३ अब्ज) असलेले व सर्वाधिक प्रभावशाली धर्म संस्थापक, तत्वज्ञ आहेत.

## बौद्ध धर्मप्रसाराचा इतिहास

गौतम बुद्ध आणि त्यांचे शिष्य ज्या प्रांतातून धर्मबोध करीत हिंडत असत व वर्षाकाठी ज्या नगरासन्निध बिहारांमध्ये जात असत, त्यांच्या नावावरून पाहता बुद्धाच्या ह्यातीत त्याच्या धर्माचे अनुयायी हिंदुस्थानच्या पूर्वेकडील प्रांतातच विशेषकरून झाले होते असे दिसते. मुख्यत्वेकरून काशी, कोसल आणि मगध ह्या प्रांतात त्याच्या धर्माचा प्रसार पुष्कळ झाला होता. शिवाय अयोध्या व बिहार ह्या प्रांतातही त्याचे अनुयायी पुष्कळ झाले होते. काही ग्रंथांच्या आधारावरून असे कळते की, बुद्धाचे शिष्य पश्चिमेकडील मुलखातही धर्मबोध करीत वेळोवेळी हिंडत असत. बुद्धाच्या अनुयायांसाठी मगध व कोसल या प्रांतातील बहुतेक मुख्य नगराजवळ आणि श्रीवास्ती (साहेतमाहेत) व राजगृह (राजघर) ह्या राजधानीच्या नगराजवळ विहार

बांधून दिले होते. स्वत: बुद्ध या नगरांजवळील विहारात कधी कधी येऊन राहत असे. बुद्धाचे देहावसान झाल्यार त्याच्या शिष्यांनी स्वगुरूंचा धर्मोपदेशक्रम सतत चालविला होता; पण बुद्धानंतर त्याच्या धर्माचा प्रसार हिंदुस्थानातील आणखी कोणकोणत्या प्रांतात झाला त्याची माहिती उपलब्ध नाही.

## बौद्ध धर्माचा भारताबाहेरील प्रसार

सयामदेशात बौद्धधर्माचा प्रसार इ.स. ६३८ मध्ये झाला. ह्या सुमारास जावा बेटामध्ये बौद्धधर्मप्रसारक थेट हिंदुस्थानातून गेले असून यांनी तेथे स्वधर्मप्रसार केला. ह्या बेटातून पुढे हा धर्म बाली व सुमात्रा ह्या बेटात प्रसार पावला असे म्हणतात. दक्षिणेकडे बुद्धास जसे अशोकाचे पाठबळ मिळून त्याच्या पंथाचा चोहोकडे प्रसार झाला; तसेच उत्तरेकडे बुद्धास शकांच्या कनिष्क नामक राजाचे साहाय्य मिळाले. सदरील ग्रीक लोकांचे राज्य बुडवून शकांनी आपली सत्ता तेथे स्थापित केली तेव्हा ह्या शकांच्या राजानी (कनिष्क) बौद्धधर्माचा स्वीकार केला. ह्या शकांचा कनिष्क हा महाप्रतापी राजा होय. कनिष्कराजाचा पूर्ण आश्रय मिळाल्यामुळे उत्तरेकडे बौद्धांनी आपल्या धर्माचा प्रसार त्याच्या विस्तीर्ण राज्यात चोहोकडे केला. इसवी सनापूर्वी दुसऱ्या शतकामध्ये काश्मिराहून काही बौद्धधर्मप्रसारकांनी बौद्धधर्मग्रंथ चीनच्या बादशहापाशी नेले. इ.स. ६२ सालात चीनच्या गादीवर जो बादशहा होता त्याने आणखी काही बौद्धधर्माचे ग्रंथ मिळवून नेले. ह्या वेळापासून पुढे बुद्धधर्माचा प्रसार चीन देशात झपाट्याने झाला आणि चौथ्या शतकामध्ये चिनी राष्ट्राचा हा मुख्य धर्म झाला.

चीन देशातून बौद्धधर्माचा प्रवेश कोरिआ प्रांतात इ.स. ३७२ सालात झाला आणि कोरिआतून तो इ.स. ५५२ सालात जपानमध्ये प्रसार पावला. चौथ्या व पाचव्या शतकामध्ये कोचीन, चीन, फोर्मोसा, मंगोलिया इत्यादी प्रांतात बुद्धधर्म चीनमधून गेला आणि काबुलहून गेलेल्या धर्मप्रसारकांनी तो यार्कन्द, बाल्क, बोखारा वगैरे ठिकाणी प्रसृत केला. नेपाळमध्ये बुद्धधर्माचा सार्वत्रिक प्रसार सहाव्या शतकामध्ये झाला. त्याचप्रमाणे तिबेटमध्ये तो याच सुमारास प्रसार पावून इ.स. ६३२ मध्ये त्या देशाच्या राजाने आपले वकील हिंदुस्थानातून बुद्धधर्म ग्रंथ आणावयास पाठविले होते. एकंदरीत या उत्तरेकडील बुद्धधर्मपंथाचा प्रसार पश्चिमेस कास्पिअन समुद्रापासून तो पूर्वेस जपानपर्यंत झाला होता.

## जपानमध्ये बौद्ध धम्माचा उदय आणि विकास

जपानमध्ये बौद्ध धर्म तळागाळातून न येत तो सम्राटाच्या संमतीने राजदरबारातून लोकांत आला. कोरियाच्या राजाने जपानच्या सम्राटाला लिहिलेल्या पत्रात बौद्ध धर्माचा प्रसार करणे कसा पुण्यकारक आहे असे लिहिले आहे आणि बौद्ध धर्माचा पुरस्कार केला. तत्कालीन राजांना असे वाटत होते की बौद्ध धर्मात बऱ्याच गोष्टी घडविण्यासाठी शक्ती आहे. परंतु नंतरच्या काळात देशाचे संरक्षण करण्यासाठी आणि देशात शांतता नांदावी म्हणून बौद्ध धर्माकडे पाहिले जात असे. जपानमध्ये बौद्ध धर्माचा उदय व विकास होण्याआधी चीन व कोरीया या देशांमध्ये बौद्ध धर्म प्रस्थापित झाला. भौगोलिकदृष्टया जापान भारताचा शेजारी राष्ट्र नाही परंतु धार्मिक दृष्टया जापानची संस्कृती भारताशी मिळती जुळती आहे. जापान या देशानी बौध्द धर्माला जीवनाच्या प्रत्येक क्षेत्र, जसे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादीमध्ये सामिल केले आहे. इलियट यांच्यानुसार ५५२ ई. मध्ये बौध्द धर्म चीन व कोरियाहून जापानपर्यंत पोहोचला. राहुल सांस्कृतायन यांच्या मते ५३८ ई. मध्ये दक्षिण कोरियातील कुदरा राज्याच्या राजानी जापानच्या राजाला बौध्द ग्रंथ, बुध्दाची मूर्ती, पूजा साहित्यासोबत एक पत्र पाठविले होते. त्या पत्रात खालील ओळी लिहल्या होत्या:—

“हा धर्म सर्व क्षेत्रातील शिक्षणामध्ये उत्तम आहे. या धर्माला समजणे कठीण आहे. चीनच्या मुनींना पण ह्या धर्माला समजण्यात वेळ लागला. या धर्मावर विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तिला अत्यंत सुखाची अनुभूती होत असून त्यांना बुध्दत्वाची प्राप्ती होते. सर्व इच्छांची पूर्ती करणाऱ्या चिंतामणि रत्नासारखाच हा धर्म मनुष्याच्या सर्व आशा अभिलाषांची पूर्ती करतो. या धर्माचा प्रसार

भारतापासून सुरू झाला असून कोरियापर्यंत पोहोचला आहे. त्याचप्रमाणे शेजारचे सर्व राष्ट्र या धर्माचे अनुयायी झाले आहेत."

या पत्रामुळे जापानमधील जनतेमध्ये बौध्द धर्मासंबंधी जागरूकता निर्माण झाली व थोडया विरोधानंतर जापानमध्ये बौध्द धर्माचा प्रसार सुरू झाला. राहुल सांस्कृतायन यांच्या मते चीनपासून बौध्द धर्म जापान देशात पोहोचला. ५२२ ई. मध्ये सिवा तचिता नावाची एक चीनी बौध्द यात्री चीनच्या पूर्वी तटाकडून जापानमध्ये निर्वासित झाली. जापानची प्रथम बौध्द भिक्खुनी याच वंशाची होती. सातव्या शतकाचे सर्वश्रेष्ठ चित्रकार देखील याच वंशाचे होते.

पूर्वी जापानी धर्मात पितृ–पूजेचे प्रचलन होते ज्याचे नाव 'सिन्तो' होते. बौध्द धर्मानी या धर्माला देशातून हटविण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. दोन्हीही धर्म अनेक बुध्द व बोधिसत्वांद्वारे चालविले जाते असे लक्षात येते. पण सातव्या शतकात सिन्तो धर्मातील सर्व विहार बौध्द धर्माला सोपविण्यात आले. जापानच्या राजदरबारात प्रवेश करण्याकरिता बौध्द धर्माला ३६ वर्षापर्यंत प्रयत्न करावे लागले. सम्राट सुशुन तश्री व त्यांची पत्नी दोन्हीही बौध्द अनुयायी होते. सम्राटद्वारे त्याच्या १९ वर्षीय पुत्र शोतोकला राजकुमार बनविण्यात आले. पण ५९२ ई.मध्ये सम्राटाच्या मृत्युनंतर बौध्द धर्मविरोधी लोकांनी त्याला राज सिंहासनावरून निष्कासित करून त्यांच्या काकु सुई ला राज सिंहासनावर बसविले. बौध्दांच्या विरोधामुळे हे शासन जास्त वेळ टिकू शकले नाही.

५९२ ई. मध्ये राज सिंहासन प्राप्त झाल्यानंतर शोतोक नी बौध्द धर्माला राजधर्म म्हणून घोषित केले. तेन्नोजीचे आश्रम ओसाका इथे स्थापित करून याच्या चारही दारांवर बौध्द देवतांची विहारे बनविली. त्याचप्रमाणे शाळा व चिकित्सालयांची स्थापना करून साहित्य, धर्म व दार्शनिक शिक्षणावर भर दिला. शोतोक स्वतः माध्यमिक दर्शनाचे विद्वान होते. सम्राट शोतोक हे ध्यानी व्यक्ति असून त्यांनी स्वतःच्या हातानी बनविलेली अवलोकितेश्वरची कास्याची मूर्ति 'होर्योजीच्या' विहारामध्ये स्थापित केली. ते या विहारामध्ये नित्यनियमाने ध्यान साधना करीत होते. भारतातील बौध्द गयाप्रमाणे या विहाराची मान्यता जापानमध्ये आहे. या विहाराला जापानी राष्ट्रीयतेचे प्रतीक समजल्या जात असून आजही हा विहार जापानी इतिहासाची कार्यशाळा आहे. डॉ. महामरू आन साकी यांच्यानुसार 'शोतोक यांचा ३० वर्षाचे शासन म्हणजे जापानी इतिहासातील अत्यंत युग प्रवर्तक असा काळ आहे'. शोतोक हे जापानी सभ्यतेचे स्थापक व राष्ट्रीय समतेचे निर्माते होते. ६२१ ई मध्ये त्यांचा मृत्यु झाला. व त्यावेळी संपूर्ण जापान देश शोकाकुल झाला. जपानमधील बौध्द धर्माचे संप्रदाय

राहुल सांस्कृतायन यांच्या मते जपानमधील बौध्द धर्मात अकरा संप्रदायांचा समावेश असून त्यांचे स्थापना वर्ष खालीलप्रमाणे आहे–

| अ.क्र. | पंथाचा नांव | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| १ | होस्सो | ६२९–७०० |
| २ | केगोन | ७४२ |
| ३ | रित्सु | ७५४ |
| ४ | तेन्दाई | ७८८ |
| ५ | शिग्ङोन | ८१५ |
| ६ | युजु नेम्बुत्स | १११७ |
| ७ | जेन | ११४०–१२१५ |
| ८ | जोदो | ११७४ |
| ९ | श्न्शु | ११७३–१२४२ |
| १० | निचिरेन | १२२२–१२८९ |
| ११ | जिशू | १२३९–१२६२ |

जपान मध्ये हिनयान व महायान दोन्हीही पंथ प्रसिध्द राहिले आहे पण महायानचा प्रभाव हिनयान पंथापेक्षा अधिक आहे. हीनयान पंथ कुश जोतिसु आहे. दोन्ही यानामध्ये फक्त विनम्रतेचा फरक असून हे यान सारखेच आहेत. फूजीवारा युगात कला व संस्कृतीच्या क्षेत्रात बौध्दांचे वर्चस्व होते तसेच जापानच्या राजकारणामध्ये ही बौध्दांचा प्रभाव असून त्यांच्याकडे भिक्खु सैन्यबळ ही होते. जपानमध्ये राजाच्या परिनिर्वाणानंतर राजधानी बदलण्यात येत होती. कारण ती अपवित्र झाली असे समजले जात

होते. ७०९ ई. मध्ये नारायेथे स्थायी राजधानी बनविण्यात आले व नविन मठ व विहारांचे निर्माण करण्यात आले. ७५२ ई. मध्ये भगवान बुध्दाची धातुची मूर्ति या नगरामध्ये स्थापित करण्यात आली. या मूर्तिला 'दाई बुत्सु' (महाबुध्द) म्हणून संबोधण्यात येते. या मूर्तिच्या प्राण प्रतिष्ठा महोत्सवात भारत, कोरिया, चीन इत्यादि देश सहभागी झाले होते.

## जपानमध्ये तेंदाई पंथाची स्थापना, विस्तार आणि संस्थापक

तेंदाई पंथ बौध्द धर्माचा विशेष प्रकार आहे ज्यामध्ये बौध्द धर्माच्या दोन्ही तत्व – थेरावादा व महायान बौध्द धर्माचा समावेश आहे. कमळ सूत्र तेंदाई पंथाचे मुख्य मंत्र आहे. या पंथाच्या अनुयायींप्रमाणे निर्वाणाची प्राप्तीकरिता या मंत्राची उच्चार करणे फायदेशीर ठरते. तेंदाई पंथाची स्थापना ८ व्या शतकाच्या अंतमध्ये (१० ऑक्टोबर ७६६ मध्ये) क्योटोच्या एनरायकुजी मंदिराच्या हाई पर्वतरावर करण्यात आली. तेंदाई पंथाचे संस्थापक साएचो (७६२–८२२) यांनी बौध्द धर्माचे शिक्षण ध्यान, तांत्रिक विद्या व कमळ सूत्रासंबंधी ज्ञान चीनच्या ताइंत–ताई शाळेत घेतले. जापानला परत आल्यानंतर त्यांनी प्रेक्षकांमध्ये या पंथासंबंधी विश्वास स्थापित केला कि बौध्द धर्माच्या शिक्षणाद्वारे कुठले ही वर्ग, सामाजिक स्थितीचे लोक निर्वाणची प्राप्ती करू शकतात. साएचो हे डेंग्यो दाएशी या नावानी ही प्रसिध्द आहेत.

कान्मु (७३७–८०६ ०१८९ व सागा (७८६–८४२) या राजाच्या आश्रयाखाली तेंदाई पंथाला अधिकृत मान्यता मिळाली. नारा बौध्द धर्मगुरूंच्या राजकीय शक्तीपासून त्रासलेले राजांनी या पंथाला प्रोत्साहन दिले. साएचो द्वारा स्थापित एनरायकुजी मंदिरात बुध्दाची मूर्ति, बोधीसत्वाच्या देवतांची स्थापना हाईन काळात करण्यात आली. साएचोच्या मृत्यूपर्यंत तेंदाईला शाळा समजले जात नव्हते. हाई पर्वतावर भिक्खुंच्या प्रशिक्षणाची परवानगी मिळाल्यानंतर हाई पर्वतावर ३००० मंदिर बांधण्यात आले व ३०,००० भिक्खुंना प्रशिक्षण देण्यात आले. या पंथाच्या मठाद्वारे शस्त्रांचा वापर करण्यात येत असून शासनाला ही त्यांनी जबरदस्तीची मागणी केली. मुख्यत: सर्व पंथाची सुरूवात हाई पर्वतावरच झाली आहे. तेंदाई भिक्खुंद्वारे १२ व्या व १३ व्या शतकात दिनची स्थापना करण्यात आली. शुध्द जमीन, झेन व निकीरेन हे सर्व पंथ तेंदाई शाळेपासून सुरू झालेले आहेत.

## तेंदाई पंथाचे तत्वज्ञान

तेंदाई तत्वज्ञानमध्ये विविध दार्शनिक अंर्तदृष्टींचा समावेश आहे जे बौध्द तत्वज्ञान व जापानी संस्कृती जसे शिंटो व पारंपारिक सौंदर्य दर्शवितात. तेंदाई तत्वज्ञान बौध्द महायानच्या मते आत्मज्ञान प्राप्त करण्याची क्षमता सर्वामध्ये आहे. सर्व लोक बौध्द धर्मापासून मोक्षची प्राप्ती करू शकतात. महायानप्रमाणे हा अभूतपूर्व अनुभवाचा जग हा मुळत: बौध्द कायद्याची अभिव्यक्ती आहे. या मतानुसार मनुष्याला अनेक अनुभवांचा सामना करावा लागतो. याच्या उलट शिंगो बौध्द धर्माच्या मते आम्ही संपूर्ण जगाला बघतो ज्याचा अर्थ धर्म आहे. तेंदाई बौध्द धर्माप्रमाणे प्रत्येक इंद्रियगोचर हे धर्माची अभिव्यक्ति करतात. तेंदाई पंथाकरिता कमळ सूत्र हा धर्माची मुख्य अभिव्यक्ति आहे. म्हणूनच वॅराकोना बौध्दाच्या कमळ सूत्राच्या उपदेशांमध्ये सर्व अनुभवांचा समावेश आहे. अज्ञानी लोकांचे अनुभव व अस्तित्व ज्यांनी बोधिसत्वाला नर्कात जाणे घोषित केला आहे त्यांना ही कमळ सूत्राच्या शिक्षणात मूलभूतपणे समतुल्यपणे शिक्षण प्रदान केले जाते. तेंदाई तत्वज्ञानाच्या या दार्शनिक अंतर्दृष्टीमुळे जापानी व्यवसायी चीनी तेंताई बौध्द धर्म अंगीकारण्याकरिता प्रेरित झाले व ज्यामुळे तेंदाई धर्माचा जापानी प्रकार निर्माण झाला.

तेंदाई तत्वज्ञानात कामीला अत्यंत पवित्र समजले जाते. बौध्द अनुयायींच्या मते ज्ञानाची प्राप्तीकरण्याकरिता अनेक जीवनातील धर्माप्रति असलेली श्रध्दा व कार्य आवश्यक आहे परंतु कामीमध्ये सार्वत्रिक बुध्दत्व प्राप्त करण्याचा प्रतिनिधित्व केला जातो. त्यांच्याद्वारे जगाला

स्वाभाविक प्रबुध्द होणे हे सत्य जगासमोर ठेवण्यात येते की धर्मावर विश्वास करणारा कुठला ही व्यक्ती स्वत:च्या शरीरात ज्ञानाची प्राप्ती करू शकतो. हा ज्ञान अर्जित करणारा व्यक्ती बुध्दापेक्षा जास्त पवित्र असतो. शिंटोद्वारे 'कामी' यांना हिंसक व मानवजातीला विरोध करणारे समजले जाते कारण ते बौध्द कायद्याला मानत नाही.

बौध्द धर्माच्या मूलभूत शिक्षणाप्रमाणे प्रबोधन प्राप्त करण्याकरिता सांसारिक मोहचा त्याग करणे आवश्यक आहे. या शिक्षणामुळे बौध्द धर्म असणाऱ्या प्रत्येक समाजाच्या संस्कृतीमध्ये संघर्ष निर्माण झाला. असे प्रश्न समोर आले कि जर मनुष्यानी सांसारिक मोह त्यागणे म्हणजे त्याला काव्य, साहित्य व कलाचा मोह त्यागणे असा आहे काय? कारण जग धर्मापासून वेगळा नाही आणि तेंदाई तत्वज्ञान तर सौंदर्य व सौंदर्याचा सलोखा करण्याची परवानगी देतो. काव्य ज्याला एक काळात वाईट समजले जात होते ते आता प्रबोधन करण्यात फायदेशीर ठरू शकते. तेंदाई तत्वज्ञानात तेंदाई धर्मा संदर्भात केलेल्या काव्याच्या चिंतनाला धर्माचा चिंतन समजले जाते. हीच गोष्ट इतर कला प्रकारांकरिता ही म्हटली जाऊ शकते. असे सौंदर्य निर्माण करणे शक्य आहे जो बौध्द धर्माच्या समर्थन दर्शवितो.

## आधार ग्रंथ सुची


1. आगलावे, प्र. ''सामाजिक संशोधन पद्धती'' श्री साईनाथ प्रकाशन १ भगवाघर कॉम्प्लेक्स, धरमपेठ, नागपूर–१, २००६.
2. केळूसकर कृष्णराव अर्जुन, गौतम बुद्धांचे चरित्र, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती २०१५, पान क्र. २२
3. लाल यमुना, प्राचीन भारत में बौध्द धर्म प्रचारक, सम्यक प्रकाशन, प्रथम संस्करण २००९, नई दिल्ली, पृ. २१३ ते २१७.
4. बोधनकर सु., अलोनी वि., सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००३.
5. कायंदे पाटील गं. वि., संशोधन पद्धती चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक–१३, जून, २००६
6. जरारे वि., सामाजिक शास्त्राची संशोधन प्रणाली अद्यवैत प्रकाशन, अकोला, प्रथम आवृत्ती २००४.
7. http://www.thedhamma. Com/Buddhists_in_th_world.htm
8. http://buddhaweekly.com/buddhism-now-2nd largest-spritual-path-1-6-billion-22-worlds-population-according-recent-studies/
9. http://www.indexmundi.com/taiwan/demographics_profile.html
10. http:// www.liquisearch.com/list_of_religious_populations/by_proportion